**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६४/२०१७** | **दिनांक ११/०८/२०१७** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. ज्ञानेश्वर जगताप,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४०३९८८१४३

**प्रा. विरेश चव्हाण,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२२०६५३४४


| **मागील हवामान सारांश दि. ०७/०८/२०१७ ते ११/०८/२०१७** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (१२/०८/२०१७ सकाळी ८:३० पासून १६/०८/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **१२/०८** | **१३/०८** | **१४/०८** | **१५/०८** | **१६/०८** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ४ | २ | ५ | १० | २० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३१ |
| किमान तापमान (अं.से) | : | २६ | २५ | २५ | २४ | २४ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ८ | ७ | ६ | ८ | ६ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८५ | ८४ | ८५ | ८५ | ८६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७६ | ७४ | ७४ | ७४ | ७८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०२२ | ०१७ | ०१२ | ०१० | ०११ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १२ ते १६ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक १२ ते १६ ऑगस्ट, २०१७ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक १२ ते १६ ऑगस्ट, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग १० ते २२ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | —— | • भात पिकाची लावणी करून ३० दिवस झाले असल्यास ८७ किलो युरीया प्रति हेक्टर खताचा दुसरा हप्ता द्यावा.<br>• भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी क्युनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २ लिटर किंवा किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही ६२५ मिली किंवा लॅमडासायहॅलोथ्रीन ५ टक्के २५० मिली यापैकी एक किटकनाशक ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे.<br>• पिकाच्या लागवडीच्या वेळेनुसार पिक एक महिन्याचे झाले असेल तर नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ४० किलो या प्रमाणात देण्यात यावा. |
| आंबा, काजू | लागवड | • आंबा, काजू आणि चिकू बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी गरजेनुसार चर खोदून घ्यावेत.<br>• १० वर्षावरील हापूस जातीच्या आंबा झाडास आकारमानानुसार पॅक्लोब्युट्रॅझॉल द्यावे. प्रत्येक झाडाचा पूर्व–पश्चिम व दक्षिण–उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून प्रती मिटर व्यासास ०.७५ ग्रॅम क्रियाशील घटक पॅक्लोब्युट्रॅझॉल (३ मिली कल्टार) द्यावे. पॅक्लोब्युट्रॅझॉलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून १० ते १२ से.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खडडे मातीने बुजवून टाकावे. पावसाची तीव्रता जास्त असलेल्या दिवसात पॅक्लोब्युट्रॅझॉल देवू नये. |
| नारळ/ सुपारी | —— | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• नारळ आणि सुपारी बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत. |
| भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका | – | • वेलवर्गीय भाज्यांना काठीचा आधार द्यावा. भाजीपाला क्षेत्रातील तणांचा बंदोबस्त करावा. तसेच प्रती गुंठ क्षेत्रास ७२० ते ८५० ग्रॅम युरिया खताचा एक तृतीयांश हप्ता द्यावा अणि मंडपाची व्यवस्था करावी. .<br>• रोपवाटिकेतील पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत. |
| दुभती जनावरे/ शेळया | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• गाई, म्हैस आणि शेळया यांना पायलाग प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.<br>• तापमान कमी होत असल्यामुळे कोंबड्यांच्या शेडमध्ये गरजेनुसार बल्बचा वापर करावा. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |